सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधी व न्याय विभाग**

**सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७**

# महाराष्ट्र वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम, १९६९

(१५ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित)

**MAHARASHTRA ACT No. LVII OF 1969**

# The Maharashtra Forest Produce (Regulation of Trade) Act, 1969

*(As modified up to 15th August, 2014)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१४

[ किंमत ६.०० रुपये ]

## महाराष्ट्र वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम, १९६९

### अनुक्रमणिका


| उद्देशिका कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व लागू होणे . . | १ |
| २. | व्याख्या | १ |
| ३. | घटक क्षेत्रांची रचना | २ |
| ४. | अभिकर्त्यांची नेमणूक | ३ |
| ५. | वनोत्पादनाच्या खरेदीवर किंवा वाहतुकीवर निर्बंध | ३ |
| ६. | सल्लागार समितीची रचना | ३ |
| ७. | राज्य शासनाने समितीशी विचारविनिमय करुन किंमत ठरविणे | ४ |
| ८. | कोठारे उघडणे व कोठारांच्या ठिकाणी विक्रीदर यादी इत्यादी विदित करणे | ४ |
| ९. | राज्य शासनाने किंवा अभिकर्त्याने वनोत्पादन खरेदी करणे | ५ |
| १०. | नोंदणी | ५ |
| ११. | वनोत्पादनाचा वापर करणा-या तयार मालाच्या कारखानदारांची आणि वनोत्पादनाच्या निर्यातकांची नोंदणी | ६ |
| १२. | वनोत्पादनाचा विनियोग करणे | ६ |
| १३. | अधिकारांचे प्रत्यायोजन. . | ६ |
| १४. | प्रवेश, झडती, जप्ती, वगैरेचा अधिकार | ६ |
| १५. | शास्ती | ६ |
| १६. | प्रयत्न आणि अपप्रेरणा . . | ७ |
| १७. | अपराधांची दखल घेणे. . | ७ |
| १८. | सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीच्या संबंधात व्यावृत्ती | ७ |
| १९. | नियम करण्याचा अधिकार | ७ |
| २०. | या अधिनियमात समाविष्ट असलेल्या प्रयोजनांसाठी गौण वनोत्पादनांना सन १९२७ चा अधिनियम १६ लागू नसणे. | ८ |
| २१. | अडचणी दूर करणे | ८ |
| २२. | निरसन व व्यावृत्ती | ८ |
| | **अनुसूची.** | ९ |

## सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७[1]

# [महाराष्ट्र [***][2] वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम, १९६९][1]

(२६ डिसेंबर १९६९)

(दिनांक २४ डिसेंबर १९६९ रोजी या अधिनियमास राष्ट्रपतींची संमती मिळाली ; व तो महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार मध्ये दिनांक २६ डिसेंबर १९६९ रोजी प्रथम प्रसिद्ध झाला).

या अधिनियमात पुढील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या :–

*सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ (१०-१२-१९९७)**

**लोकहिताच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यातील विवक्षित [2][***] वनोत्पादनाच्या व्यापारात महाराष्ट्र राज्याची मक्तेदारी निर्माण करुन अशा व्यापाराचे विनियमन करण्याकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम**

**ज्याअर्थी,** लोकहिताच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यातील विवक्षित [3][***] वनोत्पादनाच्या व्यापारात राज्याची मक्तेदारी निर्माण करुन अशा व्यापाराचे विनियमन करण्याकरिता व तत्संबंधित बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी भारतीय गणराज्याच्या अठ्ठावीसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व लागू होणे.

**१.** (१) या अधिनियमात, महाराष्ट्र [4][***] वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम, १९६९ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये व अशा तारखेस[5] किंवा अशा तारखांना तो अंमलात येईल.

(४) तो अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या [3][***] वनोत्पादनाच्या बाबतीत लागू होईल.

व्याख्या.

**२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात :–

(अ) "अभिकर्ता" म्हणजे, कलम ४ अन्वये नेमलेला अभिकर्ता ;

१९६६ चा महा. ४१.

(ब) "संहिता" म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ ;

(क) "समिती" म्हणजे, कलम ६, पोट-कलम (१) अन्वये रचना केलेली सल्लागार समिती ;

(ड) "[6][***] वनोत्पादनाचा उत्पादक" म्हणजे–

१९२७ चा १६.

(एक) भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये राखीव किंवा संरक्षित वने म्हणून वेळोवेळी रचना करण्यात येतील अशा क्षेत्रांमध्ये काढण्यात येणा-या वनोत्पादनाच्या बाबतीत राज्य शासन ; आणि

(दोन) उप-खंड (एक) खाली न येणा-या क्षेत्रांमध्ये काढण्यात येणा-या [4][***] वनोत्पादनाच्या बाबतीत–

(अ) असे [6][***] वनोत्पादन, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेचे कलम २, खंड (४१) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे भोगवट्यात नसलेल्या जमिनीवर काढण्यात येत असेल तर, राज्य शासन ;

(ब) ज्यावर असे [6][***] वनोत्पादन काढण्यात येते त्या घटक क्षेत्रात, यथास्थिती भोगवटादार किंवा कूळ किंवा धारण जमिनीचा सरकारी पट्टेदार किंवा वरिष्ठ धारक ; आणि त्यात, त्याच्यामार्फत अशा उत्पादनावर वेळोवेळी हक्क सांगेल अशा प्रत्येक व्यक्तीचा समावेश होतो.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, (इंग्रजी) १९६९, भाग पाच, असाधारण, पृष्ठ ५५७ पहा.

[2] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ८ अन्वये "गौण" हा मजकूर वगळण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये "गौण" हा मजकूर वगळण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १० अन्वये "गौण" हा मजकूर वगळण्यात आला.

[5] संपूर्ण महाराष्ट्र राज्यात, दिनांक २७ डिसेंबर १९६९–(शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक एम. एफ. पी. २१६९/२२१९६८-यु, दिनांक २७ डिसेंबर १९६९ पहा)

[6] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ११ अन्वये मूळ मजकूर वगळला.

* सन १९९७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९, सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम १४ द्वारे निरसित.

** या अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

[१][(ई) " वनोत्पादन " म्हणजे, भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये, व्याख्या करण्यात आलेले, या अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेले असे वनोत्पादन, आणि राज्य शासनास, वेळोवेळी, लोकहितार्थ, या अनुसूचीत **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे भर घालता येईल किंवा तीत फेरफार करता येईल आणि कलम १९, पोट-कलम (३) च्या तरतुदी, राज्य विधान मंडळापुढे अशी अधिसूचना ठेवण्याची व त्याच्याकडून त्यात फेरफार केल्या जाण्याशी जेथवर संबंध असेल तेथवर, त्या कलमान्वये केलेल्या कोणत्याही नियमासंबंधात त्या जशा लागू होतात तशा, अशा अधिसूचनेच्या संबंधात लागू होतील ;] १९२७ चा १६.

(फ) " विनिर्दिष्ट क्षेत्र " म्हणजे कलम १, पोट-कलम (३) अन्वये अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र ;

(ग) " कूळ " यात पुढील कुळांचा अंतर्भाव होतो—

(एक) महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम २, पोट-कलम (४०) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कूळ, आणि

(दोन) पुढील अधिनियमांत व्याख्या केल्याप्रमाणे कूळ :—

(अ) महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्राच्या संबंधात, मुंबई कुळवहिवाट व शेतजमिनी अधिनियम, १९४८ ; १९४८ चा मुंबई ६७.

(ब) महाराष्ट्र राज्याच्या हैद्राबाद क्षेत्राच्या संबंधात, हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५०. १९५० चा हैद्राबाद ११.

(क) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ प्रदेशाच्या संबंधात मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८ ; १९५८ चा मुंबई ९९.

(ह) "घटक क्षेत्र" म्हणजे कलम ३ अन्वये घटक क्षेत्र म्हणून बनविण्यात आलेला विनिर्दिष्ट क्षेत्राचा उपविभाग ;

(आय) "सरकारी पट्टेदार", "धारण जमीन", "भोगवटादार" आणि "वरिष्ठ जमीन धारक" या शब्दांचा व शब्दप्रयोगांचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत त्यांना अनुक्रमे जो नेमून दिला आहे तोच असेल ;

(जे) या अधिनियमात वापरलेले पण व्याख्या न केलेले व भारतीय वन अधिनियम, १९२७ यात व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांचा अर्थ, त्या अधिनियमात त्यांना अनुक्रमे जो नेमून दिला आहे तोच असेल ; १९२७ चा १६.

घटक क्षेत्रांची रचना.

**३.** राज्य शासनास, प्रत्येक [२][* * *] वनोत्पादनाच्या संबंधात त्यास योग्य वाटेल अशी संख्या असेल इतक्या घटक क्षेत्रात प्रत्येक विनिर्दिष्ट क्षेत्राची विभागणी करता येईल ;

---

१. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४५ याच्या कलम १२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.
२. वरील अधिनियमाच्या कलम ११ अन्वये " गौण " हा शब्द वगळण्यात आला.

**४.** (१) राज्य शासनास, आपल्यावतीने कोणत्याही [१][***] वनोत्पादनाच्या खरेदीच्या आणि त्याच्या व्यापाराच्या, प्रयोजनार्थ निरनिराळ्या घटक क्षेत्रासाठी अभिकर्ते नेमता येतील आणि अशा एखाद्या अभिकर्त्याला, एकाहून अधिक घटक क्षेत्रांसाठी नेमता येईल. अभिकर्त्यांची नेमणूक.

(२) अभिकर्त्याच्या नेमणुकीच्या अटी, शर्ती आणि कार्यपद्धती विहित करण्यात येईल अशी असेल.

**५.** (१) कलम १, पोट-कलम (३) अन्वये अधिसूचना काढल्यानंतर, कोणत्याही क्षेत्रात,— [१]* * * वनोत्पादनाच्या खरेदीवर किंवा वाहतुकीवर निर्बंध.

(अ) राज्य शासन ;

(ब) त्याबाबतीत लेखी प्राधिकृत केलेला राज्य शासनाचा अधिकारी ; किंवा

(क) ज्यात [१][***] वनोत्पादन काढण्यात आले असेल त्या घटक क्षेत्रांच्या संबंधातील अभिकर्ता ;

यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीने, ज्या [१][***] वनोत्पादनास हा अधिनियम लागू होतो त्या [१][***] वनोत्पादनाची खरेदी किंवा वाहतूक करता कामा नये.

**स्पष्टीकरण एक**—राज्य शासनाने किंवा पूर्वोक्त शासकीय अधिका-यांने किंवा अभिकर्त्याने केलेली [१][***] वनोत्पादनाची खरेदी ही, या अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करून करण्यात आलेली खरेदी असल्याचे मानण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण दोन**—धारण जमिनीत कोणताही हितसंबंध नसलेल्या ज्या व्यक्तीने, अशा धारण जमिनीवर काढण्यात आलेले, कोणतेही [१][***] वनोत्पादन गोळा करण्याचा हक्क संपादन केला असेल त्या व्यक्तीने या अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करुन असे उत्पादन खरेदी केले असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) कोणत्याही [१][***] वनोत्पादनाच्या उत्पादकास आपल्या मालकीच्या वनोत्पादनाची, ते ज्या घटक क्षेत्रात काढण्यात आले असेल त्या घटक क्षेत्रातील कोणत्याही ठिकाणापासून त्या घटक क्षेत्रातील इतर कोणत्याही ठिकाणी वाहतूक करता येईल ; आणि

(ब) [१][***] वनोत्पादनाचा उपयोग करून राज्यात तयार माल बनविण्यासाठी कोणत्याही व्यक्तीने किंवा राज्याबाहेर विक्रीसाठी, कोणत्याही व्यक्तीने, राज्य शासनाकडून किंवा उक्त पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिका-याकडून किंवा अभिकर्त्याकडून खरेदी केलेल्या अशा [१][***] वनोत्पादनाची अशा व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा प्राधिका-याने त्याबाबत द्यावयाच्या परवान्याच्या अटीस व शर्तीस अनुसरून व विहित करण्यात येईल त्या रीतीने, त्या घटक क्षेत्राबाहेर वाहतूक करता येईल.

(३) [१][***] वनोत्पादनाची विक्री करण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ते, उक्त घटक क्षेत्रात असलेल्या कोणत्याही कोठाराच्या ठिकाणी, पूर्वोक्त शासकीय अधिका-यास किंवा अभिकर्त्यास विकता येईल.

**६.** (१) राज्य शासन, १ जुलै रोजी सुरु होऊन त्याच्या निकटनंतरच्या ३० जूनला समाप्त होणा-या प्रत्येक वर्षासाठी राज्यातील एक किंवा अधिक महसुली आयुक्तांच्या विभागांसाठी प्रत्येक [१][***] वनोत्पादनाच्या संबंधात, एक सल्लागार समिती स्थापन करील, ही समिती, राज्य शासनाकडून वेळोवेळी, अधिसूचीत करण्यात येईल अशा, जास्तीत जास्त नऊपर्यंत असतील इतक्या सदस्यांची मिळून बनलेली असेल. ही समिती, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार, असा विभाग किंवा असे विभाग यांमध्ये विक्रीसाठी जे देऊ करण्यात येईल असे [१][***] वनोत्पादन ज्या वाजवी व रास्त किंमतीला राज्य शासनाकडून किंवा त्यांच्या प्राधिकृत अधिका-यांकडून किंवा अभिकर्त्याकडून खरेदी करण्यात येईल ती किंमत, वेळोवेळी, निश्चित करण्याच्या बाबतीत राज्य शासनास सल्ला देईल ; सल्लागार समितीची रचना.

परंतु, या सदस्यांपैकी दोन सदस्य त्या त्या [१][***] वनोत्पादनाच्या व्यापा-यांपैकी किंवा अशा उत्पादनाचा उपयोग करणा-या तयार मालाच्या कारखानदारांपैकी असतील ; आणि चार सदस्य, राज्य शासनाखेरीज त्या त्या [१][***] वनोत्पादनाच्या उत्पादकांपैकी असतील.

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ११ अन्वये " गौण " हा शब्द वगळण्यात आला.

(२) राज्य शासन समितीकडे विचारार्थ पाठवील. अशा इतर बाबींवर राज्य शासनास सल्ला देणे हे सुद्धा समितीचे कर्तव्य असेल.

(३) समितीचे कामकाज विहित करण्यात येईल अशा रीतीने चालविण्यात येईल.

(४) समितीच्या सदस्यांना, विहित करण्यात येतील असे भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

परंतु, राज्य विधानमंडळाच्या सदस्यास, समितीचा सदस्य म्हणून अधिकारपद धारण करीत असताना, समितीच्या अशा पदधारकास समितीच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी किंवा असा पदधारक म्हणून इतर कोणतीही कामे पार पाडण्यासाठी झालेला व्यक्तीगत खर्च भागविण्याच्या प्रयोजनार्थ देण्यात येणारा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा असे इतर भत्ते यांचेखेरीज कोणतेही भत्ते मिळण्याचा हक्क असणार नाही.

(५) समिती, राज्य शासन याबाबत प्रत्येक समितीसाठी विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या आत राज्य शासनास, आपला सल्ला देईल.

राज्य शासनाने समितीशी विचारविनिमय करुन किंमत ठरविणे.

**७.** कोणत्याही विशिष्ट [१][***] वनोत्पादनाच्या बाबतीत कलम ६ अन्वये रचना केलेल्या समितीशी विचारविनिमय केल्यानंतर, राज्य शासन, त्या उत्पादनाच्या उत्पादकाकडून ज्या किंमतीस असे उत्पादन शासन किंवा त्याचा कोणताही प्राधिकृत अधिकारी किंवा अभिकर्ता खरेदी करील ती किंमत ठरवील व ती **शासकीय राजपत्रात** विहित करण्यात येईल अशा रीतीने, दिनांक ३१ डिसेंबर नंतरची नसेल अशा तारखेस, प्रसिद्ध करील ; आणि अशा रीतीने ठरविलेल्या किंमतीत, ती ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षात फेरफार करण्यात येणार नाही :

परंतु समितीने, कलम ६ च्या पोट-कलम (५) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत (किंवा राज्य शासन मुभा देईल त्याप्रमाणे जास्तीत जास्त पंधरा दिवसापर्यंत इतक्या अतिरिक्त कालावधीत) सल्ला दिला नाही तर, राज्य शासनास समितीशी विचारविनिमय केल्याशिवाय, किंमत ठरविण्यासाठी कार्यवाही करता येईल :

परंतु आणखी असे की, भिन्न घटक क्षेत्रांसाठी भिन्न किंमती ठरविता येतील आणि असे करताना इतर गोष्टींबरोबर खालील गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत :—

(अ) घटक क्षेत्रात समाविष्ट असलेल्या क्षेत्राच्या बाबतीत, मागील तीन वर्षात या अधिनियमान्वये किंवा कोणत्याही अधिनियमितीअन्वये त्या त्या [१][***] वनोत्पादनास मिळणा-या किंवा त्याच्या निश्चित केलेल्या किंमती ;

(ब) घटक क्षेत्रात लागवड करण्यात येणा-या [१][***] वनोत्पादनाचा दर्जा ;

(क) घटक क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेल्या परिवहनाच्या सुविधा :

(ड) परिवहनाचा खर्च ; आणि

(इ) त्या घटकात प्रचलित असलेल्या अकुशल कामगारांच्या मजुरीची सर्वसाधारण पातळी.

कोठारे उघडणे व कोठाराच्या ठिकाणी विक्रीदर यादी इत्यादी विदित करणे.

**८.** प्रत्येक घटक क्षेत्रात, तेथील [१][***] वनोत्पादनाच्या उत्पादकांची सोय विचारात घेऊन, राज्य शासन निदेश देईल इतकी व अशा ठिकाणी कोठारे स्थापन करण्यात येतील ; व कलम ७ अन्वये राज्य शासनाद्वारे अशा उत्पादनाची ठरविण्यात आलेली विक्रीदर यादी आणि कामाच्या वेळा, अशा प्रत्येक कोठाराच्या ठिकाणी त्या प्रयोजनार्थ ठेवलेल्या सूचनाफलकावर ठळकपणे लावण्यात येतील.

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ११ अन्वये “ गौण ” हा शब्द वगळण्यात आला.

**९.** (१) राज्य शासन किंवा त्याचा प्राधिकृत अधिकारी किंवा अभिकर्ता कामाच्या वेळात, कोठाराच्या ठिकाणी विक्रीकरिता देऊ केलेले [१][***] वनोत्पादन, कलम ७ अन्वये ठरविलेल्या किंमतीने खरेदी करण्यास बांधलेले राहतील : राज्य शासनाने किंवा अभिकर्त्याने [१][***] वनोत्पादन खरेदी करणे.

परंतु, राज्य शासनास किंवा प्राधिकृत अधिका-यास किंवा अभिकर्त्यास, कोणतेही [१][***] वनोत्पादन, ते ज्याकरिता वापरात येत असेल अशा तयार मालाच्या निर्मितीच्या प्रयोजनासाठी किंवा इतर कोणत्याही व्यापारी प्रयोजनासाठी त्यांच्या मते योग्य नसेल तर ते खरेदी करण्यास नकार देता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या परंतुकान्वये प्राधिकृत अधिका-याने किंवा अभिकर्त्याने [१][***] वनोत्पादन नाकारल्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, ते प्रकरण, त्या दिवसापासून १५ दिवसांच्या आत विभागीय वन अधिका-याकडे किंवा ज्या घटकात [१][***] वनोत्पादन काढण्यात आले असेल त्यावर अधिकारिता असेल अशा राज्य शासनाने या बाबतीत ज्यास अधिकार दिलेला असेल त्या इतर अधिका-याकडे पाठविता येईल.

(३) पोट-कलम (२) खालील तक्रार मिळाल्यानंतर, यथास्थिति, विभागीय वन अधिका-याने किंवा अशा इतर अधिका-याने, घटनास्थळी किंवा मुख्यालयांमध्ये विहित रितीने चौकशी केली पाहिजे आणि संबंधित पक्षांची किंवा त्यांच्या प्राधिकृत अभिकर्त्यांची बाजू ऐकल्यावर, त्यास योग्य वाटतील असे आदेश दिले पाहिजे, आणि जर [१][***] वनोत्पादनाची खरेदी करण्यास दिलेला नकार अयोग्य असल्याचे त्यास आढळून आले तर त्यास,—

(अ) प्रस्तुत [१][***] वनोत्पादन, तयार मालाच्या निर्मितीकरिता किंवा इतर कोणत्याही वाणिज्यिक प्रयोजनासाठी अजूनही योग्य आहे असे त्याला वाटले तर, यथास्थिति, प्राधिकृत अधिका-यास किंवा अभिकर्त्यास ते विकत घेण्याचा निदेश देता येईल, आणि व्यथित झालेल्या व्यक्तीस, तिला देण्याजोग्या [१][***] उत्पादनाच्या किंमतीच्या जास्तीत जास्त वीस टक्क्यांपर्यंत त्यास योग्य वाटेल अशी आणखी भरपाई देता येईल ;

(ब) प्रस्तुत [१][***] वनोत्पादन तयार मालाच्या निर्मितीकरिता किंवा इतर कोणत्याही वाणिज्यिक प्रयोजनाकरिता आता अयोग्य झाले आहे असे त्याला वाटले तर, व्यथित व्यक्तीस पोट-कलम (१) अन्वये [१][***] वनोत्पादनाच्या किंमतीपेक्षा कमी नसेल अशी कोणतीही रक्कम व अशा व्यक्तीने सोसलेल्या तोट्यादाखल नुकसानभरपाई म्हणून अशा किंमतीच्या वीस टक्क्यांहून अधिक नसेल अशी त्यास योग्य वाटेल इतकी भरपाईची रक्कम देण्याचा निदेश देता येईल.

(४ ) एखादे [१][***] वनोत्पादन राज्य शासनाच्या मालकीच्या वनातील किंवा जमिनीतील आहे असे राज्य शासनास किंवा त्याच्या प्राधिकृत अधिका-यास किंवा अभिकर्त्यास सकारण वाटत असेल तर, अशा वनोत्पदनाचा विनियोग करण्यास व राज्य शासन वेळोवेळी ठरवील एवढा गोळा करण्याचा खर्च असल्यास तेवढाच तो देण्यास प्रतिरोध होतो असा या कलमातील कोणत्याही गोष्टीचा अन्वयार्थ लावता कामा नये :

परंतु, कोणताही विवाद असल्यास त्या बाबतीत, विभागीय वन अधिकारी किंवा पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, याबाबत ज्यास विनिर्देशपूर्वक अधिकार प्रदान करण्यात आले असतील अशा अन्य अधिका-याने विवादाची सुनावणी केली पाहिजे आणि त्यात तरतूद केलेल्या रीतीने, तो निकालात काढला पाहिजे.

(५) पोट-कलम (४) च्या परंतुकामध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही अधिका-याच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा निर्णय मिळाल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीत, राज्य शासनाकडे अपील करता येईल ; आणि अशा अपीलावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

**१०.** राज्य शासनाव्यतिरिक्त [१][***] वनोत्पादनाच्या इतर प्रत्येक उत्पादकाने, वर्षभरात त्याने उत्पादित केलेल्या अशा उत्पादनाचे परिमाण, विहित करण्यात येईल अशा परिमाणापेक्षा अधिक होण्याचा संभव असेल तर, विहित रीतीने स्वतःची नोंदणी करून घेतली पाहिजे. नोंदणी.

---

१. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ११ अन्वये “ गौण ” हा शब्द वगळण्यात आला.

[1][***] वनोत्पादनाचा वापर करणा-या तयार मालाच्या कारखानदारांची आणि [1][***] वनोत्पादनाच्या निर्यातकांची नोंदणी

**११.** (१) [1][***] वनोत्पादनाचा वापर करणा-या तयार मालाच्या प्रत्येक कारखानदाराने आणि [1][***] वनोत्पादनाच्या प्रत्येक निर्यातकाने, विहित करण्यात येईल अशा कालावधीत, विहित करण्यात येईल अशी फी देऊन आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने, स्वतःची नोंदणी करून घेतली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये नोंदणी झालेल्या प्रत्येक कारखानदाराने आणि निर्यातकाने विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा तारखेस, अशा रीतीने अधिकथन दिले पाहिजे.

[1][***] वनोत्पादनाचा विनियोग करणे.

**१२.** या अधिनियमान्वये राज्य शासनाने किंवा त्याच्या अधिका-याने किंवा अभिकर्त्याने खरेदी केलेले कोणतेही [1][***] वनोत्पादन, राज्य शासन निदेश देईल अशा रीतीने विकण्यात येईल किंवा त्याचा अन्यप्रकारे विनियोग करण्यात येईल.

अधिकारांचे प्रत्यायोजन.

**१३.** राज्य शासनास, हा अधिनियम किंवा तद्न्वये करण्यात आलेले नियम याखालील आपले अधिकार किंवा कामे यापैकी कोणतेही अधिकार किंवा कामे सहायक वन संरक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिका-याकडे किंवा प्राधिका-याकडे, आदेशाद्वारे प्रत्यायोजित करता येतील. हा अधिकारी किंवा प्राधिकारी, राज्य शासन आदेशामध्ये विनिर्दिष्ट करील अशा शर्तींना आणि निर्बंधांना अधीन राहून त्यांचा वापर करील किंवा ती पार पाडील.

प्रवेश, झडती, जप्ती, वगैरेचा अधिकार.

**१४.** (१) फौजदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही पोलीस अधिका-यास किंवा राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमाच्या किंवा तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदीचे अनुपालन करुन घेण्यासाठी किंवा उक्त तरतुदींचे अनुपालन करण्यात आले असल्याची स्वतःची खात्री करून घेण्यासाठी—

(एक) [1][***] वनोत्पादनाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी किंवा वापरण्याचा उद्देश असलेली कोणतीही व्यक्ती, नौका, वाहन किंवा पात्र थांबविता येईल आणि त्याची झडती घेता येईल ;

(दोन) कोणत्याही ठिकाणी प्रवेश करता येईल आणि त्याची झडती घेता येईल ;

(तीन) ज्या [1][***] वनोत्पादनाच्या संबंधात या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन झाले आहे, होत आहे किंवा होण्याचा संभव आहे, असा त्यास संशय असेल तर त्याला असे उत्पादन ज्या पात्रात असेल ते पात्र, किंवा असे उत्पादन नेण्यासाठी वापरलेले वाहन किंवा नौका यांसह, त्या [1][***] वनोत्पादनाचे, अभिग्रहण करता येईल.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८* ची झडती आणि अभिग्रहण, यांच्या संबंधातील कलमे १०२ आणि १०३ यांच्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, या कलमाखालील अभिग्रहण आणि झडत्या यांना लागू होतील. १८९८ चा ५०.

शास्ती.

**१५.** जर कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या नियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले तर—

(अ) तिला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कैदेची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(ब) ज्या [1][***] वनोत्पादनाच्या संबंधात असे उल्लंघन करण्यात आले असेल ते [1][***] वनोत्पादन किंवा न्यायालयास योग्य वाटेल असा त्याचा भाग सरकारजमा करण्यात येईल.

---

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ११ अन्वये "गौण" हा शब्द वगळण्यात आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा दोन) पहा.

परंतु संपूर्ण [1][***] वनोत्पादन किंवा यथास्थिती त्याचा कोणताही भाग सरकारजमा करण्याचा निदेश देणे आवश्यक नाही असे न्यायालयाचे मत झाल्यास, ते कारणे नमूद करुन, असे करण्यापासून परावृत्त राहू शकेल.

**१६.** जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करील किंवा उल्लंघन करण्यास अपप्रेरणा देईल तिने अशा तरतुदींचे उल्लंघन केले असल्याचे मानण्यात येईल. प्रयत्न आणि अपप्रेरणा.

**१७.** विभागीय वन अधिका-यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही वन अधिका-याने किंवा याबाबतीत राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा इतर कोणत्याही अधिका-याने या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधात जी वस्तुस्थिती अंतर्भूत आहे त्या वस्तुस्थितीविषयी लेखी प्रतिवेदन केले नसल्यास, कोणत्याही न्यायालयाने अशा अपराधाची दखल घेता कामा नये. अपराधांची दखल घेणे.

**१८.** (१) हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले नियम यानुसार सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीच्या संबंधात व्यावृत्ती.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींमुळे किंवा हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले नियम यानुसार सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेली किंवा होण्याचा संभव असलेली कोणतीही हानी किंवा पोहोचलेली किंवा पोहोचण्याचा संभव असलेली कोणतीही क्षती याबद्दल राज्य शासनाविरूद्ध कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**१९.** (१) या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे पालन करण्याकरिता राज्य शासनास पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन राहून नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषतः व पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता अशा नियमात खालील सर्व बाबींसाठी किंवा त्यापैकी कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल :—

(अ) अभिकर्त्यांची नेमणूक करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ब) [1][***] वनोत्पादनाच्या विक्रीदर याद्या विदित करणे ;

(क) या अधिनियमाअन्वये चौकशी करण्याची रीत ;

(ड) ज्या प्राधिका-याकडून, ज्या रीतीने आणि ज्या अधिकारांच्या अधीन राहून परवाने देण्यात येतील तो प्राधिकारी, ती रीत आणि त्या शर्ती ;

(इ) कलम १० अन्वये नोंदणी करण्याची रीत ;

(फ) (एक) नोंदणी करण्याची रीत, ज्या कालावधीत अशी नोंदणी करावयाची तो कालावधी आणि कलम ११, पोट-कलम (१) अन्वये त्याकरिता देय असलेली फी ;

(दोन) कलम ११, पोट-कलम (२) अन्वये अधिक धन ज्या नमुन्यात, ज्या प्राधिका-याला ज्या तारखेस आणि ज्या रीतीने द्यावयाचा तो नमुना, तो प्राधिकारी, ती तारीख आणि ती रीत ;

(ग) या अधिनियमान्वये जी एकतर स्पष्टपणे किंवा गर्भितार्थाने विहित करणे आवश्यक असेल अशी कोणतीही इतर बाब.

(३) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीन दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील आणि असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचीत करतील तर, अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून यथास्थिती

---

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ११ अन्वये "गौण" हा शब्द वगळण्यात आला.

अशा फेरफार केलेल्या स्वरुपातच नियम अंमलात येतील किंवा ते अंमलात येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरफार किंवा विलोपन यामुळे उक्त नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

या अधिनियमात समाविष्ट असलेल्या प्रयोजनांसाठी [1][***] वनोत्पादनांना सन १९२७ चा अधिनियम १६ लागू नसणे.

**२०.** भारतीय वन अधिनियम, १९२७ यातील कोणतीही गोष्ट या अधिनियमात ज्यासाठी तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्या बाबीच्या संबंधात [1][***] वनोत्पादनांना लागू होणार नाही. १९२७ चा १६.

अडचणी दूर करणे.

**२१.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, आदेशाद्वारे त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी तरतुदींशी विसंगत नसणारी कोणतीही गोष्ट करता येईल.

निरसन व व्यावृत्ती.

**२२.** (१) महाराष्ट्र [1][***] वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अध्यादेश, १९६९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन केलेल्या अध्यादेशानुसार किंवा तदन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही ही, हा अधिनियम २२ ऑक्टोबर १९६९ रोजी अंमलात आला होता असे समजून त्याअन्वये करण्यात आली आहे असे समजण्यात येईल.

---

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ११ अन्वये " गौण " हा शब्द वगळण्यात आला.

# अनुसूची

[कलम २ (इ) पहा]

**१.** टेंभूर्णीची (किंवा तेंदुची) पाने.

[1][**२.** (बॅन्हीनिया रासेमोसा) आपट्याची पाने.]

---

[1] ही नोंद शासकीय अधिसूचना, महसुल व वन विभाग, क्रमांक एमएफपी-१५६९-२१६०१२-(ए) यू, दिनांक २४ जून १९७१ अन्वये दाखल करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  **शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन**
  **महाराष्ट्र राज्य**
  (प्रकाशन शाखा), नेताजी सुभाष मार्ग,
  चर्नी रोड, मुंबई ४०० ००४.
  दूरध्वनी : २३६३२६९३, २३६३११४८, २३६३०६९५, २३६३४०४९.

- **व्यवस्थापक**
  **शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ, पुणे ४११ ००४.
  दूरध्वनी : २६१२४७५९, २६१२५८०८, २६१२८९२०,

- **व्यवस्थापक**
  **शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार**
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१.
  दूरध्वनी : २५६२६१५.

- **सह संचालक**
  **शासकीय लेखन सामग्री भांडार व ग्रंथागार**
  शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : २३३१४६८.

- **व्यवस्थापक**
  **शासकीय मुद्रणालय ग्रंथागार व लेखन सामग्री**
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर ४१६ ००३.
  दूरध्वनी : २६५०३९५, २६५०४०२.

**व महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**